# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 23/03/2015 (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक 23 मार्च 2015 रोजी (का.प.क्र .16) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-10 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
04. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
05. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
06. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला

श्री.त्र्यबंक तुपे : जालाननगर येथील रस्ता, गार्डन,लाईटच्या संदर्भात मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे साहेब यांनी बैठक घेतली शहर अभियंता यांना तेथील कामासाठी सुचना केल्या होत्या. ती कामे चालू नाही. प्रशासनाला तसे आदेशीत करावे. क्रातीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावर अनेक अपघात होतात मा.न्यायालयाच्या मंजूरीने गतिरोधक टाकण्याचे आदेशीत करावे आजच मा.पालकमंत्री यांनी घोषणा केली की गुंठेवारी च्या संदर्भात मुदतवाढ होण्याची शक्यता आहे.मा.मुख्यमंत्री महोदय यांनी त्यास मान्यताही दिली. यासाठी मा.खासदार, मा.आमदार व सर्व मनपाचे पदाधिकारी सदस्य यांनी पाठपुरावा केला.या सर्वाचे अभिनंदन करावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :शहरात 60 टक्के गुंठेवारी भाग येतो गुंठेवारी रेग्युलाईज करणे व मुदतवाढीचा प्रश्न प्रलंबीत होता तेथे काम करता येत नव्हते.मा.पालकमंत्री महोदय यांचे सांगण्यावरून काम मार्गी लागत आहे. यासाठी मा.खासदार मा.आमदार व सर्व पदाधिकारी यांनी प्रयत्न केले नागरीकांनीही गुंठेवारी भरत राहिले.मनपास साथ दिली त्यांना ही धन्यवाद दयावे.

श्री.मीर हिदायत अली :अभिनंदनास माझे अनुमोदन,गुंठेवारीचा विषय अनेक दिवसापासून चालू आहे. रहिवासी टॅक्स भरत असतांना त्यांना सुविधा देऊ शकत नव्हतो.शासनाकडून गुंठेवारी करण्यास मान्यता होत असेल तर आनंदाची गोष्ट आहे अभिनंदन करायलाच पाहिजे.

श्री.काशीनाथ कोकाटे : शासनाच्या विचाराधीन हा विषय होता आज तसे परीपत्रक निघण्याची शक्यता, गुंठेवारीस मुदवाढ दिल्यास यापासून जनतेला लाभ होईल कौतुकास्पद बाब आहे.अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवला सर्वाचे सहकार्य लाभलेले आहे शासनाने निर्णय घेतला असेल तर अभिनंदन करावेच गुंठेवारीचा लाभ या भागात देऊ शकतो. या भागात विकास कामे करण्यासाठी शासनाने 24 कोटी पहिला हप्ता दिला. पाणी ड्रेनेज रस्ते विदयुत या सुविधा देण्यासाठी 100 कोटी निधी मागवावा.

श्री.त्रिंबक तुपे :40-45 वार्डात गुंठेवारी वसाहत येतात 100 कोटी देणे बाबत मा.पालकमंत्री यांचे मार्फत शासनाकडे मागणी करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :गुंठेवारीचा विषय मार्गी लागला व शासनाने सुविधा देणेसाठी निधी दयावा.माझ्या वार्डात एका रस्त्याचे 20 फुटाचे काम केले उर्वरीत काम बंद आहे शहर अभियंता यानी लक्ष दयावे.

मा.सभापती : मा.पालकमंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार करून गुंठेवारी विषय मार्गी लावला.त्यामूळे मा.मुख्यमंत्री व मा.पालकमंत्री तसेच मा.आमदार व मा.खासदार व मनपाचे सर्व स.पदाधिकारी यांनी यासाठी प्रयत्न केले.या सभागृहाच्या वतीने सर्वांचे अभिनंदन करतो.या वसाहतीमध्ये विकास कामासाठी शासनाने 100 कोटी निधी दयावा अशी मागणी या समितीच्या मार्फत प्रशासनाने शासनास करावी.तसेच जालननगर भागातील विविध विकास कामाचे टेंडर झाले कामे सुरू करावी. तसेच क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर कोकनवाडी चौक व इतर आवश्यक ठिकाणी गतीरोधक टाकण्यात यावे.

**विषय क्र. 144 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्र.क्र. 96, हमालवाडा रेल्वेस्टेशन येथील शहर विकास आराखडा आरक्षण क्रमांक-339, न.भू.क्र.18762 मध्ये शाळा इमारती बांधणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2012-2013 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 49,99,900/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च प्रो पुअर बजेट या लेखा शिर्षकामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण पाच निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.गरूड कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 6.66% कमी दराने |
| 02. | श्री.सिद्दीकी जलीसुद्दीन | अ.प.दरापेक्षा 7.50% जास्त दराने |
| 03. | मे.अमन असोसिएटस् | अ.प.दरापेक्षा 8.79% जास्त दराने |
| 04. | श्री. शेख सलीम मोहीउद्दीन | अ.प.दरापेक्षा 30.55% जास्त दराने |
| 05. | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | तांत्रिकदृष्ट्या नाकारण्यात आले. |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.66% कमी दराची मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.66% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र. 96, हमालवाडा रेल्वेस्टेशन येथील शहर विकास आराखडा आरक्षण क्रमांक-339, न.भू.क्र.18762 मध्ये शाळा इमारती बांधणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.66% कमी दराची मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 145 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रेल्वेस्टेशन ते उस्मानपुरा पेट्रोल पंप रस्त्यावर ऑक्टॅग्नल पोलसह 250 वॅट एचपीएसव्ही फिटींग लावण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाच्या सन 2013-14 दरसुचीनुसार रक्कम रू.49,92,682/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता होऊन सदर कामासाठी निविदा सूचना क्र./ई-निविदा/265/2014 अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता, एकूण पाच (05) निविदा दराचा भरणा करून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | मे.ईगल ईलेक्ट्रीकल | - | 5.79% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 02. | मे.न्यु इरा ईलेक्ट्रीकल | - | 3.55% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 03. | मे.मातोश्री ईलेक्ट्रीकल | - | 2.99% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| 04. | मे. श्री ईलेक्ट्रीकल | - | 4.78% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| 05. | मे.एस.पी. ईलेक्ट्रीकल | - | 9.99% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

वरील प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.79% कमी दराने मे.ईगल ईलेक्ट्रीकल, यांची निविदा आहे. संबंधीताने भरणा केलेले दर जास्त असल्याने वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% कमी दराने काम करण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी मे.ईगल ईलेक्ट्रीकल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळचे सर्व विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

श्री.मीर हिदायत अली :पेपरला जे 16 वार्ड संदर्भात मतदार यादी संदर्भात आले त्यात माझाही वार्ड आहे ज्यांनी चुका केल्या त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती : मतदार याद्या व्यवस्थीत कराव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन ते उस्मानपुरा पेट्रोल पंप रस्त्यावर ऑक्टॅग्नल पोलसह 250 वॅट एचपीएसव्ही फिटींग लावण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ईगल ईलेक्ट्रीकल, यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% कमी दराने मे.ईगल ईलेक्ट्रीकल, यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 146 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात भुमीगत गटार योजना राबविणे व विविध ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधणेचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून, सदर काम राज्य व केंद्र शासनाच्या अनुदानातून व मनपाच्या सहभागातुन राबविण्यात येत आहे. कामाचा कार्यादेश दिनांक 01.07.2014 रोजी देण्यात आला असून, या कामांतर्गत शहराच्या विविध भागात जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे व झाल्टा, कांचनवाडी येथे सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सिवेज ट्रीटमेंट प्लांट हे पडेगांव, झ ाल्टा, कांचनवाडी आणि बनेवाडी तसेच गोलवाडी येथे सिवेज पंपींग स्टेशन प्रस्तावीत आहे. या प्रकल्पांतर्गत पडेगांव येथे 10 द.ल.ली. क्षमतेचा एस.टी.पी. बांधावयाचा आहे. येथील जागेचे सर्वेक्षण केले असता येथे मनपाच्या मालकीची जमीन उपलब्ध नाही. त्यामुळे सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्यासाठी योग्य जमीनीचा शोध घेतला असता व स्थळाचे सर्वेक्षण या प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी केले असता या ठिकाणी गट नं.13/3 जयसिंगपुरा येथे साधारणपणे 2 हेक्टर 52 आर खाजगी मालकीची जमीन आढळुन आली आहे. सदर जागा सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्यासाठी योग्य असल्याने या जमीनीचे मालक श्री जगन्नाथ श्रीपत पेरकर व इतर सहा जण यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या मालकीचे एकुण सामायीक क्षेत्र 2 हेक्टर 40 आर पैकी एक एकर जमीन महानगरपालिकेला योग्य तो आर्थिक मोबदला घेऊन जागा हस्तांतरीत

करण्याची तयारी दर्शविली आहे. या ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधणेसाठी कंत्राटदारास जागा उपलब्ध करुन देण्याचे काम महानगरपालिकेचे आहे, परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे या ठिकाणी मनपाच्या मालकीची जमीन उपलब्ध नाही. तथापी या ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधणे आवश्यक असल्याने योग्य क्षेत्रफळाची जमीन खाजगी मिळकत धारकाकडुन खरेदी करणे हा एकमेव पर्याय महानगरपालिकेसमोर उपलब्ध आहे. यासाठी चालु सिध्दशिघ्रगणक (Ready Recknor) दरानुसार होणाऱ्या जमीनीच्या किंमती एवढी आर्थिक तरतुद महानगरपालिकेला करावी लागेल. मात्र महानगरपालिकेची सद्यआर्थिक स्थिती सक्षम नसल्याने सदर बाब तुर्त शक्य होणार नाही. परिणामी सदर प्रकल्पांतर्गत पडेगांव येथे सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्याचे काम रेंगाळू शकते. त्यामुळे या कामाचे कंत्राटदार खिलारी इन्फ्रास्ट्रक्चर यांना महानगरपालिकेच्या वतीने तुर्त जमीन खरेदी करण्यास आपण तयार आहात किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी दिलेल्या लेखी संमतीनुसार महानगरपालिकेने जर त्यांनी खरेदी केलेल्या जमीनीची किंमत प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत त्यांना अदा करण्याचे हमीपत्र दिले, तर ते या ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्यासाठी सुमारे एक एकर जागा महानगरपालिकेच्या वतीने खरेदी करणेसाठी तयार असल्याचे त्यांनी कळविले आहे. त्यांनी त्यांच्या पत्रात कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या वतीने व महापालिकेसाठी त्यांनी खरेदी केलेल्या जागेचा मोबदला महानगरपालिका प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत अदा करावी तसेच महानगरपालिका कंत्राटदारास ज्या वर्षी ही रक्कम अदा करील, ती रक्कम त्या वर्षाच्या शिघ्रगणक दरानुसार असावी या अटीवर ते ही जमीन महानगरपालिकेसाठी व महानगरपालिकेच्या वतीने स्वत:च्या खर्चाने विकत घेण्यास तयार आहेत.

सदर जागा पडेगांव शिवारात जयसिंगपुरा भागात स्थित असून, सदर जागेस जाण्यासाठी जागेवर रस्ता विकसीत झालेला आहे. मात्र सदर जागा ही सध्याच्या विकास आराखड्यानुसार उद्यानासाठी राखीव असल्याने (Garden G-1) येथे सिवेज ट्रीटमेंट प्लांटचे कोणतेही बांधकाम देय होणार नाही. तथापी वर उल्लेख केल्यानुसार या जमिनीचे मिळकतधारक यांनी सदर जागा महानगरपालिकेस विक्री करण्याची तयारी दर्शविल्याने व सदर जमीन सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्यासाठी सुयोग्य असल्यामुळे या जमीनीवर सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्यासाठी विकास योजना आराखड्यात आरक्षण ठेवावे लागेल. सध्या विकास योजना आराखड्याचे काम करण्यात येत आहे. त्या अंतर्गत सदर जमिनीवरील उद्यानाचे आरक्षण बदलुन त्या जागेवर सिवेज ट्रीटमेंट प्लांटचे आरक्षण टाकणे आवश्यक आहे. मान्यता झाल्यास तशी मागणी नोंदविणारे सुचनापत्र नगर रचना विभागास पाठविण्यात येईल. तरी सदर जमीन चालु वर्ष 2015 च्या सिध्दशिघ्रगणक नुसार महानगरपालिकेसाठी संबंधीत कंत्राटदार मे.एस.एस.खिलारी हे स्वखर्चाने खरेदी करण्यास तयार असल्याने त्यास मान्यता प्रदान करावी. तसेच संबंधीत कंत्राटदार मे.एस.एस.खिलारी यांना महानगरपालिकेतर्फे या जमीनीचा मोबदला प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत अदा करण्यास मान्यता व्हावी. प्रकल्पाचा बांधकाम कालावधी संपण्यापुर्वी कंत्राटदारास जमीनीचा मोबदला महानगरपालिका अदा करील आणि सदर मोबदला महानगरपालिका ज्यावर्षी अदा करील त्या वर्षाच्या सिध्दशिघ्रगणक (Ready Recknor) दरानुसार अदा करील असे हमीपत्र तुर्त महानगरपालिकेतर्फे देण्यासाठी मान्यता व्हावी.

करीता उक्त नमुद प्रमाणे महानगरपालिकेसाठी सिवेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्याबाबत सुमारे एक एकर जागा खरेदी करण्यास या कामाचे कंत्राटदार मे.खिलारी इन्फ्रास्ट्रक्चर यांना ठरावात नमुद अटी व शर्तीनुसार संमतीपत्र देणे योग्य वाटते. त्यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार पडेगाव शिवारातील जयसिंगपुरा भागातील गट नं.13/3 जयसिंगपुरा येथील एकत्रित जमिन क्षेत्र 2 हेक्टर 52 आर पैकी 1 एकर जागा औरंगाबाद शहरात भुमिगत गटार योजना राबविणे व सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट उभारणे या केंद्र व राज्य शासन अनुदानीत प्रकल्पाअंतर्गत पडेगाव भागात सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट बांधण्यासाठी योग्य असल्याने व या जमिनीचे मालक श्री जगन्नाथ श्रीपत पेरकर व इतर सहा जण यांनी दर्शविलेल्या संमतीनुसार त्यांच्या एकुण सामाईक क्षेत्रापैक्ी साधारणत: 1 एकर

जमिन महानगरपालिकेतर्फे बांधण्यात यावयाच्या सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट बांधण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने या कामाचे कंत्राटदार श्री एस.एस. खिलारी यांना महानगरपालिकेसाठी जमिन खरेदी करण्यास नाहरकत कळविणेस्तव व भविष्यात या कामाचे कंत्राटदार यांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सिध्द शिघ्रगणकदरानुसार खरेदीमुल्य अदा करणेस्तव सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात येते. तसेच प्रस्तावित जागेवरील मंजूर विकास योजनेनुसार असलेले उद्यानाचे आरक्षण, विकास योजना सुधारीत करण्याचे काम चालू असून त्या अंतर्गत आरक्षण बदलण्यासाठी योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 147 :**

दिनांक 03/07/2014 (का.प.क्र.02), दि.19/07/2014 (का.प.क्र.03), दि.08/08/2014 (का.प.क्र.04), दि.26/08/2014 (का.प.क्र.05), दि.03/09/2014 (का.प.क्र.06), दि.18/11/2014 (का.प.क्र.07), दि.10/12/2014 (का.प.क्र.08), दि.22/01/2015 (का.प.क्र.09), दि.29/01/2015 (का.प.क्र.10), दि.12/02/2015 (का.प.क्र.11), दि.27/02/2015 (का.प.क्र.12), दि.05/03/2015 (का.प.क्र.13), दि.16/03/2015 (का.प.क्र.14), दि.16/03/2015 (का.प.क्र.15) व आज दिनांक 23/03/2015 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक 03/07/2014 (का.प.क्र.02), दि.19/07/2014 (का.प.क्र.03), दि.08/08/2014 (का.प.क्र.04), दि.26/08/2014 (का.प.क्र.05), दि.03/09/2014 (का.प.क्र.06), दि.18/11/2014 (का.प.क्र.07), दि.10/12/2014 (का.प.क्र.08), दि.22/01/2015 (का.प.क्र.09), दि.29/01/2015 (का.प.क्र.10), दि.12/02/2015 (का.प.क्र.11), दि.27/02/2015 (का.प.क्र.12), दि.05/03/2015 (का.प.क्र.13), दि.16/03/2015 (का.प.क्र.14), दि.16/03/2015 (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस व आज दिनांक 23/03/2015 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त स्विकृतीसह कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद